मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेहकरात ; महायुतीचे उमेदवार आ. संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा >>पान 2

सुसंस्कृत महाराष्ट्र घडवायचा असेल तर महाराष्ट्र स्वराज्य पक्ष शिवाय पर्याय नाही- छत्रपती संभाजी राजे >>पान 3

महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचाराचा झंजावत >>पान 4


सुविचार

स्वतःवर विश्वास ठेवल्यास यश प्राप्त होते.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034





'सिंघम अगेन' आणि 'भूल भुलैया ३'नं केला बॉक्स ऑफिसवर धमाका, कमाईचे आकडे आले समोर... आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 93 ■ सोमवार, दि. 11 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## एटीएम फोडून रोकड चोरणारी हरयाणातील टोळी गजाआड, स्थानिक गुन्हे शाखा आणि शिरूर पोलिसांची कामगिरी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** एटीएम गॅस कटरने कापून रोकड चोरण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्य टोळीला स्थानिक गुन्हे शाखा आणि शिरूर पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून कंटेनर, एटीएम कापण्यासाठी लागणारे गॅस कटर, गॅस टाकी, कटावणी, पहार, दोरी असा १५ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कुतूबुद्दीन अख्तर हुसेन (वय ३१, राजस्थान), यसीन हारून खान (वय ३२) राहुल रशीद खान (वय ३२, दोघे रा. हरयाणा)अशी अटक करण्यात आलेल्या आरोपीची नावे आहेत. हरयाणा आणि राजस्थानमध्ये एटीएम फोडून रोकड चोरी करणारी टोळी पुणे जिल्हयात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्याअनुषंगाने पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. चोरट्यांची टोळी पुणे–नगर रस्त्यावरील सरहदवाडी गावाजवळ एका ढाब्याच्या परिसरात थांबल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मदतीने कारवाई केली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तिघांना ताब्यात घेतले.

पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले, हनुमंत गिरी, तुषार पंदारे, जनार्धन शेळके, संजू जाधव, प्रफुल्ल भगत, विजय शिंदे, नीरज पिसाळ, नितेश थोरात, निखिल रावडे यांनी ही कामगिरी केली. चोरट्यांच्या टोळीने राज्यात कोठे एटीएम फोडून रोकड चोरीचे गुन्हे केले आहेत का ? , यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## सचिन-रिकी पॉंटिंग किंवा कोहली-स्मिथ नव्हे, बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये या फलंदाजाच्या नावावर आहे हा अनोखा विक्रम

**मुंबई / प्रतिनिधी:** बॉर्डर–गावसकर करंडक स्पर्धेला २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे आणि पुन्हा एकदा जगातील दोन सर्वोत्तम क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर भिडणार आहेत. बॉर्डर–गावस्कर करंडक च्या दीर्घ इतिहासात, सचिन तेंडुलकर, रिकी पॉंटिंग, विराट कोहली, मॅथ्यू हेडन, स्टीव्ह स्मिथ यांसारख्या महान फलंदाजांनी खूप धावा केल्या आहेत. या ट्रॉफीमध्ये अनेक शतके आणि द्विशतके झळकावणाऱ्या या फलंदाजांच्या नावावर अनेक विक्रम आहेत. असे असूनही, असाही एक विक्रम आहे, जो अशा महान व्यक्तींच्या नावावर नाही तर अशा खेळाडूच्या नावावर आहे ज्याचा दर्जा त्यांच्यापेक्षा खूपच खालचा आहे. बॉर्डर–गावस्कर ट्रॉफीमध्ये ० धावांवर न आऊट न होता सर्वाधिक धावा करण्याचा हा विक्रम आहे आणि हा फलंदाज आहे– सायमन कॅटिच. होय, हा अनोखा विक्रम भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या दिग्गज फलंदाजांच्या नावावर नाही, ज्यांनी मिळून जवळपास २०० कसोटी शतके झळकावली आहेत.




# मुख्यमंत्र्यांसह पक्षप्रमुखांची मेहकर मतदारसंघात सभा

## जिल्ह्यातील राजकीय राजधानीकडे लागले नेत्यांचे लक्ष

## आपलाच उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रतिष्ठापनाला

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर / प्रतिनिधी:** मेहकर विधानसभा मतदारसंघ हा बुलढाणा जिल्ह्यातील राजकारणाचा केंद्रबिंदू आहे. जिल्ह्यातील राजकीय राजधानी म्हणून मेहकर लोणार मतदार संघाकडे पाहिले जात असून मेहकर मतदार संघ हा आपल्याच हाती राहावा, यासाठी महाविकास आघाडी, महायुती यासह वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शर्तीचे प्रयत्न केले जात असून नेत्यांनी प्रतिष्ठापणाला लावली आहे. मेहकर मतदारसंघातील लोणार येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकतीच जाहीर सभा घेत विरोधकांवर जहरी टीका केली आहे. तर वंचित बहुजन आघाडीचे सर्वे सर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर व शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मेहकर येथे सभा आयोजित करण्यात आली आहे.जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्याच्या राजकारणातील महत्त्वाचे पक्ष असलेल्या पक्षप्रमुखांची सभा मेहकर लोणार मतदार संघात होत असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष हे मेहकर लोणार मतदारसंघाकडे लागले आहे.

राज्यातील मोठ्या जिल्ह्यामधील बुलढाणा हा एक महत्त्वाचा जिल्हा आहे.बुलढाणा जिल्ह्यामध्ये सात मतदारसंघ असून संपूर्ण जिल्ह्याचा राजकीय केंद्रबिंदू हा मेहकर लोणार मतदारसंघ राहिला आहे. त्याचबरोबर मेहकर लोणार मतदार संघाने सुरुवातीपासूनच शिवसेनेला झुकते माप दिल्याने मेहकर लोणार मतदारसंघ हा शिवसेनेचा कायम बालेकिल्ला राहिला आहे. या मतदारसंघात जागतिक पर्यटनाचा वारसा लाभलेला



आहे. उल्का पात्रापासून तयार झालेले जगप्रसिद्ध लोणार सरोवर हे मेहकर या मतदारसंघात आहे.त्याचबरोबर मेहकर ही बालाजी सारंगधर नगरी म्हणूनही ओळखली जाते.ऐतिहासिक, पुराणिक महत्त्व असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील राजकारणाकडे जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण राज्याचे कायम लक्ष लागलेले असते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा, राष्ट्रमाता जिजाऊ यांचे माहेरघर, नैसर्गिक देन लाभलेला व पर्यटनाचा समृद्ध वारसा हा या जिल्ह्याला लाभलेला आहे. राष्ट्रीय महामार्गावर तसेच समृद्धी महामार्गावर मेहकर लोणार मतदार संघ असल्याने या मतदारसंघाला संपूर्ण राज्यातच एक महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. या मतदारसंघात व बुलढाणा जिल्ह्यात आपल्या पक्षाचे उमेदवार निवडून यावे, बुलढाणा जिल्ह्यात आपली एकहाती सत्ता राहावी, यासाठी सर्वच प्रमुख पक्षाच्या वतीने जीवाचे रान करून प्रयत्न केले जात आहेत.प्रमुख नेत्यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लागली आहे.मेहकर लोणार मतदार संघासह जिल्ह्यातील बुलढाणा, चिखली, जळगाव, यासह सातही मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी आपली संपूर्ण राजकीय ताकद लावून प्रतिष्ठा पणाला लावली आहे. मेहकर लोणार मतदार संघात नुकतेच उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी लोणार येथे जाहीर सभा घेऊन दोन वर्षांपूर्वी राजकीय बंड केलेल्या शिंदे गटाच्या शिवसेनेवर ताशेरे ओढले आहे. त्याचबरोबर मतदार संघातील दगड धोंड्यांना शेंदूर लावून त्यांना देवाचे रूप देण्याचा प्रयत्न केला. मात्र नसानसात गद्दारी भरलेल्या या धोंड्यांनी आपले मूळ रूप दाखवून आपण धोंडेच असल्याचे दाखवून दिले. अशी टीका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर करीत विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. तर महाविकास आघाडीतील प्रमुख विरोधक असलेले उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सभेवर सभा घेण्याचे नियोजन करून शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा मेहकर येथे आयोजित केली आहे. तर आरक्षित असलेला हा मतदारसंघ आपल्या हक्काचा असून तो आपल्या ताब्यात राहावा, यासाठी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांचीही सभा मेहकर येथे आयोजित केली आहे. मतदार संघातील प्रमुख लढतील उमेदवारांच्या प्रचारार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मेहकर येथे सभा होणार असल्याने या सभे सभांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

### सिद्धार्थ खरात, डॉ. संजय रायमुलकर व ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारासाठी मतदार संघात नेत्यांच्या सभा

मेहकर लोणार मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात, महायुतीचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर, वंचित बहुजन आघाडी व शेतकरी क्रांतिकारी संघटनेचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा ऋषाक चव्हाण यांच्या प्रचारासाठी मेहकर मतदार संघात पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या सभा होत असल्याने मेहकर मतदार संघाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी महायुतीवर टीका केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्यावर तसेच महाविकास आघाडीवर काय बोलतात. याबाबत मतदारसंघातच नव्हे तर संपूर्ण राज्यात उत्सुकता लागली आहे. त्याचबरोबर एक हुशार व बहुजनांचे हित जोपासणारे नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर हे आपल्या सभेमध्ये कोणावर टीका करतात, कोणता मुद्दा उपस्थित करतात. याबाबत मतदारसंघातीलच नव्हे तर राज्यातील राजकीय तज्ञांचे लक्ष लागले आहे.

# भाजपाच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचं आश्वासन , शेतकऱ्यांना कर्जमाफीसह 'या' घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. पुढच्या दहा दिवसात राज्य निवडणुकीला सामोरं जाणार आहे. दरम्यान भाजपाने त्यांचा जाहीरनामा प्रकाशित केला आहे. लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देणार असं यात जाहीर करण्यात आलं आहे. तसंच इतरही घोषणा करण्यात आल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार पियुष गोयल तसंच चंद्रशेखर बावनकुळे यांचीही यावेळी उपस्थिती होती.



भाजपाच्या जाहीरनाम्यात कुठल्या घोषणा?

लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला रु. १५०० वरुन रु. २१०० देण्यात येतील तसेच या योजनेचे औचित्य साधून महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल. महिला सुरक्षेसाठी २५००० महिलांचा पोलिस दलात समावेश करण्यात येईल.

शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला रु. १२,००० वरून रु. १५,०००, तसेच एमएसपीशी समन्वय साधत २० टक्क्यांपर्यंत भावांतर योजना राबविण्यात येईल.

प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्यात येईल.

वृद्ध पेंशन धारकांना महिन्याला रु. १५०० वरुन रु. २१०० देण्यात येतील जेणेकरून संपूर्ण महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांना अधिक आर्थिक सुरक्षा आणि सन्मान मिळेल.

महाराष्ट्रातील सर्व कुटुंबांना बाजारातील उतार–चढावांपासून सुरक्षित करण्यासाठी राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यात येतील.

येणाऱ्या काळात २५ लाख रोजगार निर्मिती तसेच महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना रु. १०,००० विद्यावेतन देण्यात येईल.

जाहीरनाम्यातील ठळक मुद्दे काय आहेत?

१० राज्यातील ग्रामीण भागात ४५,००० गावांत पांधण रस्ते बांधण्यात येतील.

अंगणवाडी आणि आशा सेविकांची आर्थिक सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी महिन्याला रु१५,००० वेतन आणि विमा संरक्षण देण्यात येईल.वीज बिलात ३०म कपात करुन सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्यात येईल.

सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत' व्हिजन महाराष्ट्र २०२९ सादर करण्यात येईल.

देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर ठेवण्याचं आमचं धोरण आहे. फिनटेक आणि एआयचं हब म्हणून महाराष्ट्र झालेला दिसेल. या दोन्हीचं सर्वात मोठं केंद्र महाराष्ट्र असेल. तसंच या क्षेत्रात नोकरीच्याही अनेक संधी आहेत, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंआहे. २०२७ पर्यंत ५० लाख लखपती दीदी तयार करण्याचा आमचा संकल्प आहे. असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

## राजकीय जाहिरातींच्या फोन कॉलमुळे मतदारांची वाढली डोकेदुखी!

**ठाणे/प्रतिनिधी:** मोबाईलवर येणाऱ्या अनोळखी जाहिरातींच्या फोन कॉलमुळे अगोदरच सर्वजण वैतागले असताना, आता निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राजकीय पक्ष मोबाईलवर जाहिराती करून मतदाराला वेठीस धरत आहेत. फोनद्वारे राजकीय जाहिरातीतून मतदाराला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असून, मात्र अचानक येणाऱ्या अनोळखी फोन वरील राजकीय जाहिरातींमुळे सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. महाराष्ट्रात (२० नोव्हेंबर रोजी) विधानसभा निवडणुकीचे मतदान आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी मतदाराला आपलंसं करण्याच्या दृष्टीने सर्वच स्तरातून प्रयत्न केला जातो आहे. आपल्या पक्षाचे काम किती चांगले आहे हे सांगण्यासाठी पक्षाचे दिग्गज नेते मैदानात उतरले आहेत.


ठिकठिकाणी त्यांच्या मोठ्या सभा देखील पार पडत आहेत. सोबतच सोशल मीडियाचा वापर करून राजकीय जाहिरातींच्या माध्यमातून जास्तीत–जास्त लोकांपर्यंत आपल्याच पक्षाला मतदान करण्यासाठी गरळ ओकली जात आहे. मात्र मोबाईल फोनवर राजकीय जाहिरातीची स्पर्धा बघायला मिळते आहे. आत्ताच्या तरुण पिढीला सोशल मीडियाच महत्त्व समजत असले तरी, ज्येष्ठ व्यक्ती अथवा दुर्गम आदिवासी भागात मोबाईल नेटवर्क उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनेकांकडे कॉलिंग करण्यासाठीचा मोबाईल असतो. शहर ग्रामीण भागात मोबाईलवर फोन आलाच, तर पटकन उचलला जातो. त्यामुळे मोबाईल कॉलवर राजकीय जाहिराती केंद्रित केल्या आहेत. मोबाईलवर येणारा कॉल महत्वाचा मानून प्रत्येकजण उचलत असतो. मात्र राजकीय जाहिरातींच्या कॉलमुळे सर्वजण मेटाकुटीला आले आहेत.

# महिलांना महिना ३ हजार अन् बसचा मोफत प्रवास; महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचा जाहीरनामा महाराष्ट्रनामा प्रकाशित करण्यात आलाय. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात शेतकरी, युवक, महिला आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित केलंय. तसेच महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना महिना ३ हजार रुपये मिळणार असून, महिलांना बस प्रवास मोफत देण्याचंही आश्वासन देण्यात आलंय. महाविकास आघाडीनं मुंबईत हॉटेल ट्रायडंटमधून हा जाहीरनामा प्रसिद्ध केलाय. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, खासदार सय्यद नासीर हुसेन, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत, खासदार अभिषेक मनु सिंघवी, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, शिवसेना उबाठाचे खासदार अरविंद सावंत उपस्थित आहेत.

१०० दिवसांचा अजेंडा जाहीर: विकास आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात १०० दिवसांचा अजेंडा जाहीर केला. पदवीधर आणि पदविका असलेल्या बेरोजगार तरुणांना दरमहा ४ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिलंय. जाहीरनाम्यात महाराष्ट्रात नवे औद्योगिक धोरण बनवण्याबाबत सांगितलंय. त्यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीसुद्धा उपस्थितांना संबोधित केलंय. राज्याचे




आणि देशाचे मुंबईकडे लक्ष असते. आर्थिक, उद्योग, गुंतवणूक बाबींमध्ये महाराष्ट्र पुढे आहे. राज्याची निवडणूक देशासाठी महत्त्वपूर्ण असून, देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे, असंही मल्लिकार्जुन खरगेंनी अधोरेखित केलंय.

महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर उत्तम प्रशासन मिळणार: ते पुढे म्हणाले की, राज्यातील विद्यमान महायुती सरकारला हटवून महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर उत्तम प्रशासनाची हमी देतो. शेतकरी, तरुणांसाठी निवडणूक महत्त्वाची असून, मुंबईत आलेली व्यक्ती कधीही उपाशी राहत नाही. मुंबई हे सर्वकष विकासाचे शहर असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलंय. महाराष्ट्राच्या भविष्याचा विचार अन् अभ्यास करून हा महाराष्ट्रनामा तयार करण्यात आलाय. मोदी नेहमी काँग्रेसवर खोटेपणाचा आरोप करतात, काल आमच्या मुख्यमंत्र्यांनी आम्ही काय केलं ते सांगितलं, महायुतीची अनैतिक आणि असंविधानिक सत्ता असल्याचाही घणाघातही मल्लिकार्जुन खरगेंनी केलाय. भाजपाने पक्षांचे चिन्ह चोरले असून, पन्नास खोके एकदम ओके घरात भरुन ठेवा. महाराष्ट्राचे सरकार खोके सरकार आहे. महाराष्ट्र विकासासाठी आमचा पंचसूत्री कार्यक्रम असल्याचंही मल्लिकार्जुन खरगेंनी सांगितलं. प्रत्येक कुटुंबाला वार्षिक ३ लाख रुपयांची मदत देणार असून, लाडकी बहीण योजनासुद्धा आमची कॉपी केलीय. आम्ही कर्नाटकात दोन हजार रुपये आधीच दिलेत, असंही ते म्हणालेत.

महाविकास आघाडीची पंचसूत्री

१– महालक्ष्मी

महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन

बसमध्ये महिलांसाठी मोफत प्रवासाची सुविधा

२– समानतेची हमी

जातीय जनगणना करण्याचे आश्वासन

५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटवण्याची चर्चा

३– कौटुंबिक संरक्षण

२५ लाखांपर्यंत आरोग्य विम्याचे आश्वासन

मोफत औषधांची सुविधा

४– कृषी समृद्धी

शेतकऱ्यांचे तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचं आश्वासन

नियमित कर्ज परतफेडीवर ५०,००० रुपयांचे प्रोत्साहन

५– तरुणांना वचन

बेरोजगारांना दरमहा ४,००० रुपयांची आर्थिक मदत

## मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिन

आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

# मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेहकरात ; महायुतीचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : शिवसेना-भाजप राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे मेहकर विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ मंगळवारी दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मेहकर येथील स्वातंत्र्य मैदानावर महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.या सभेला मतदार संघातील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

अतिशय धाडसी निर्णय घेणारे मुख्यमंत्री आणि लाडक्या बहिणींचे भाऊ म्हणून ओळखलं जाणारे एकनाथ शिंदे यांनी अल्पावधीतच प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. शिवसेनेचा



ढाण्या वाघ म्हणून एकनाथ शिंदे संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जातात. तर नुकतीच माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची लोणार येथे जाहीर सभा झाली.त्या पार्श्र्वभूमीवर मेहकर येथे एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा होत आहे.त्यामुळे मेहकर विधानसभा मतदारसंघातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात ते काय बोलतात याची उत्सुकता निर्माण झाली आहे. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच जे बोलतो ते करतो असे मुख्यमंत्री म्हणून त्यांची ओळख आहे.त्यामुळे त्यांच्या सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.या सभेला य केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. महायुतीतील मित्र पक्षांच्या इतरही नेत्यांची सभेला प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. शहरी व ग्रामीण भागामध्ये एकनाथ शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा प्रभाव असून या जाहीर सभेला हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना,भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोकांच्या अफाट प्रेमाने मी कृतकृत्य होऊन जातो : आ. संजय रायमुलकर

## पळसखेड येथील जनतेने काढली सजविलेल्या बैलगाडीतून मिरवणूक





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : माझ्याइतके जनतेचे प्रेम कुठल्याही आमदाराला मिळाले नसेल.मतदार संघातील प्रत्येक गावात प्रत्ययाला येणारे सामान्य माणसांचे असीम प्रेम ही माझी खरी कमाई असून पळसखेड येथील माझ्या मतदारांनी माझी सजविलेल्या बैलगाडीतून काढलेली मिरवणूक आणि फुलांचा केलेला वर्षाव ,खरेच मी कृतकृत्य झालो आहे ,असे चिंब भावनांनी ओथंबलेले उदगार आमदार संजय रायमुलकर यांनी काढताच उपस्थितांनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाट केला.

जनतेचे असे जगावेगळे प्रेम,स्नेह पाहून आमदार रायमुलकर खूपच भावनिक झाले होते.गाव दौऱ्याच्या निमित्ताने त्यांचे पदाधिकाऱ्यांच्या ताफ्यासह पळसखेड येथे आगमन झाले तेंव्हा नागरिकांनी ढोल ताशांच्या गजरात प्रचंड घोषणाबाजी करत त्यांचे उस्फुर्त स्वागत केले. नारळाच्या फांद्या ,फुलांनी सजविलेल्या बैलगाडीतून महायुतीचे उमेदवार संजय रायमुलकर यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली.जे सी बी द्वारे फुलांच्या पाकळ्यांची मोठ्या प्रमाणावर उधळण करण्यात आली.कोण आला रे कोण आला,शिवसेनेचा वाघ आला , असा कसा येत नाही,आल्याशिवाय रहात नाही अशी युवकांनी प्रचंड घोषणाबाजी केली. थोरा मोठ्यांचे आशीर्वाद घेत व गावातील मंदिरांमध्ये दर्शन घेत आमदार रायमुलकर यांनी मोठ्या संख्येने धनुष्यबाण निशाणीचे बटन दाबून विक्रमी मतांनी विजयी करण्याचे घरोघर जात आवाहन केले. गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत प्रचंड जल्लोषात प्रचार रॅलीने संपूर्ण गावाची परिक्रमा केली.नंतर झालेल्या सभेत आमदार संजय रायमुलकर यांनी वरील भावोदगार काढले .भावनाविवश होत त्यांनी भाषणाला सुरुवात केली. लोकांचे निरपेक्ष प्रेम पाहून नकळत त्यांच्या डोळ्यात अश्रूंची दाटी झाली. स्वतःला कसेबसे आवरत त्यांनी पुढे भाषण सुरू ठेवले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाडसी निर्णय घेत लोकांच्या भल्यासाठी अहोरात्र काम केल्याचे सांगून रायमुलकर पुढे म्हणाले की,त्यांचा प्रत्येक लोकोपयोगी निर्णय महत्वाचा आहे.जास्त रक्कम भरावी लागत होती म्हणून खूप कमी शेतकरी पीकविम्याचे प्रस्ताव सादर करत होते,परंतु महायुती सरकारने एक रुपयात पीकविमा भरण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आणि प्रत्येक शेतकऱ्याला त्याचा मोठा फायदा झाला .अतिवृष्टी , दुष्काळ , गारपीट यामुळे झालेल्या पिकांची नुकसान भरपाई मीळवून देण्यात आली.त्यासाठी आम्ही सभागृहात आवाज उठवला. भावफरकाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात आली.

लाडकी बहिण योजनेद्वारे महिलांना अधिक सक्षम करण्याचे काम करण्यात आले,असे सांगून संजय रायमुलकर म्हणाले की, बोलतो तसे करतो असे एकनाथ शिंदे यांचे काम असून सरकारने पाच महिन्यांची प्रत्येकी साडेसात हजार रुपये मायमाऊल्यांच्या बँक खात्यात जमा केले.मेहकर,लोणार तालुक्यातील एक लाख ७ हजार लाडक्या बहिणींच्या खात्यात ७९ कोटी ५४ लाख रुपये जमा करण्यात आले.यामुळे महिला सक्षमीकरणआणि सोबतच ग्रामीण भागातील अर्थचक्रालाही गती मिळाली. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता मोठ्या प्रमाणावर मतदान करून विक्रमी मतांनी विजयी करण्याचे रायमुलकर यांनी आवाहन केले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी यांच्यासह इतर वक्त्यांनी यावेळी आपले विचार मांडले. तालुका प्रमुख भगवानराव सुलताने , डॉ.एकनाथ घुगे , विजय सानप , भाजपचे ॲड. शिवाजी सानप, महिला आघाडीच्या आशाताई झोरे , श्रीमती अंजलीताई गवळी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी ,कार्यकर्ते आणि महिला , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील पहूर, दाभा, जफ्राबाद, बागुलखेड, गुंधा , गुंजखेड, हिरडव, गायखेड या गावांना भेटी देऊन आमदार संजय रायमुलकर यांनी नागरिकांशी हितगुज केले.प्रत्येक गावामध्ये मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे यावेळी दिसून आले.प्रचार रॅल्यांमध्ये महिला ,पुरुष ,युवकांचा सहभाग बघता रायमुलकर यांचा विजय निश्र्चित असल्याची परिस्थिती दिसून आली.

## मविआचा मुख्यमंत्रिपदाबाबत काय निर्णय झालाय? शरद पवार सस्पेन्स मिटवत म्हणाले..

**मुंबई/प्रतिनिधी:** ''महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार येऊन आमच्या तीन पक्षांमधील एक नेता मुख्यमंत्री होईल'', असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं आहे. ते म्हणाले, ''आम्हाला राज्यात स्पष्ट चित्र दिसतंय की महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात महाविकास आघाडीचं सरकार येईल. सध्या राज्यात मविआला अनुकूल वातावरण आहे. सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणूक पार पडली. त्यावेळी जनतेने त्यांच्या मनात काय आहे ते स्पष्ट सांगितलं आहे. पाच वर्षांपूर्वी लोकसभा निवडणूक झाली होती, तेव्हा काँग्रेसला केवळ एक जागा जिंकता आली होती, तर आम्ही चार जागा जिंकल्या होत्या. आता झालेल्या (२०२४) लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने तब्बल ३१ जागा जिंकल्या. यावरून लोकांचा कल काय आहे ते स्पष्ट झालं आहे''.

शरद पवार म्हणाले, ''लोकसभा निवडणुकीच्या आधी देखील भाजपा व महायुतीवाले सांगत होते की डबल इंजिन सरकार येणार. देशभर नरेंद्र मोदींच्या नावाचा प्रचार करत होते. तरीदेखील लोकांनी आम्हाला प्रचंड पाठिंबा दर्शवला. आता लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून तसेच इतर काही योजनांच्या माध्यमातून पैसे ओतायचं काम चालू आहे. परंतु, लोकांमध्ये इतरही काही चर्चा आहेत. मी अनेक महिलांशी बोललो आहे. त्यांनी मला सांगितलं की लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून त्यांच्या बँक खात्यात पैसे आले तरी देखील त्या खुश नव्हत्या. त्या मला म्हणाल्या, तेलाचे भाव तुम्हाला माहिती आहेत का? महागाई किती वाढली आहे? याची तुम्हाला कल्पना आहे का? आम्ही मोठ्या कष्टाने मुलांना वाढवलं, मुलं पदवी घेऊन कॉलेजातून बाहेर पडली, मात्र त्यांना नोकरी नाही, हाताला काम नाही. अनेक मुलं बेकार हिंडतायत. म्हणजे एका हाताने सरकार देतंय आणि दुसऱ्या हाताने काढून घेतंय. त्या महिला सरकारविरोधात संतप्त होत्या''.

# डॉ. ऋतुजा चव्हाण यांनी शेतकऱ्यांशी भेट घेऊन साधला संवाद; शेतकऱ्यांचाही डॉ. चव्हाण यांना पाठिंबा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडी व घटक पक्ष असलेल्य शेतकरी क्रांतिकारी संघटनेच्या उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण यांनी मेहकर विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा झंजावत सुरू केला असून या प्रचारादरम्यान वंचितच्या उमेदवार डॉ. ऋतुजा चव्हाण यांनी बाजार समितीमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधून चर्चा केली व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्यांनीही वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा दिला. मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघ हा बुलढाणा जिल्ह्यातील राजकारणाचा केंद्रबिंदू आहे. मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातून संपूर्ण जिल्ह्यातील राजकारणाचा गाडा हाकला जातो. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघाला



जिल्ह्यात एक विशेष महत्त्व आहे. यावेळेस विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने सर्व ताकदीनिशी उडी घेत विधानसभा निवडणुकीत विजय संपादन करण्याचा निर्धार केला आहे. गत दोन दिवसांपासून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार ऋतुजा चव्हाण यांनी प्रचाराला प्रारंभ केला असून मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील विविध गावात भेट देऊन मतदारांशी संवाद साधला आहे. तर या प्रचारादरम्यान त्यांनी बाजार समितीमध्ये जाऊन सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सोयाबीनसाठी लागणारे श्रम, पेरणी ते कापणी पर्यंत लागणारा खर्च, यासह निंदण या सर्व बाबीबाबत शेतकऱ्यांसह सोबत चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तर एकरी होणारे उत्पादन व एकरी होणारा खर्च याबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेतली असता त्यांनी शासनाच्या धोरणावर तीव्र शब्दात ताशेरे ओढले. उत्पादन खर्च आणि उत्पादन यामध्ये प्रचंड तफावत असल्याने शेतकऱ्यांना शेती करणे हे आतबट्ट्याचे ठरत असल्याचे शेतकर्यांनी सांगितले. तर डॉ. ऋतुजा



चव्हाण यांनी यावेळी शेतकऱ्यांसोबत विविध विषयावर संवाद साधून शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्र्वासन दिले. दिवसा वीज पुरवठा, शेतमालाला हमीभाव आदी प्रश्र्न निकाली काढून शेतकऱ्यांना न्याय देऊ असे आश्र्वासन यावेळी त्यांनी दिले. तर शेतकऱ्यांनी हे उच्च विद्याविभूषित सामाजिक कार्याची जाण असणाऱ्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ.ऋतुजा चव्हाण यांच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा दिला. गावागावात मिळणारा पाठिंबा व युवक महिला यांचा वंचित बहुजन आघाडीकडे असलेला ओघ पाहता मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र मतदारसंघात दिसून येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सुसंस्कृत महाराष्ट्र घडवायचा असेल तर महाराष्ट्र स्वराज्य पक्ष शिवाय पर्याय नाही- छत्रपती संभाजी राजे

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** पाचोरा भडगाव विधानसभा मतदार संघाच्या महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे अधिकृत उमेदवार नानासाहेब प्रताप हरी पाटील यांच्या प्रचारार्थ आज छत्रपती संभाजी राजे यांची जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते यात राजे म्हणाले की राजकारण इतकं गलिच्छ पद्धतीने चालू आहे ७५ वर्षात इतक्या गोंधळाचं राजकारण कधी पाहायला मिळालं नाही.

कोणीही विकासावर बोलायला तयार नाही काय चाललंय हे सगळं महाराष्ट्रात दोन शिवसेना दोन राष्ट्रवादी खुर्च्या सांभाळण्यासाठी हे घाणेरडं राजकारण चालू आहे. हे पुसून काढण्यासाठी परिवर्तन महाशक्ती हाच पर्याय आहे सुसंस्कृत महाराष्ट्र घडवायचा असेल तर महाराष्ट्र स्वराज्य पक्ष शिवाय पर्याय नाही अमेरिकेत गेल्यावर देखील भारतीय नागरिक आपल्या महाराष्ट्रात काय चाललंय याबाबत विचारणा करतात हे ऐकून मी देखील गोंधळून जातो सत्तेसाठी हे एकत्र देखील भविष्यात येऊ शकतात त्यामुळे एक सुसंस्कृत सुशिक्षित अभ्यास व्यक्तिमत्व असलेल्या नानासाहेब प्रताप पाटील यांना आम्ही उमेदवारी दिलेली आहे आपल्या भागाचा विकास कसा करता येईल याबरोबर आपल्या मतदारसंघातील प्रश्न ते विधानसभेत चांगल्या प्रकारे मांडू शकतील आज सत्ताधारी आमदार सांगतात ३००० कोटीचा विकास केला आहे परंतु साधा आरोग्याचा प्रश्न देखील मिटवू शकले नाहीत तुमच्या ग्रामीण रुग्णालयात मी आज गेलो तर अक्षरशा घाणीचे साम्राज्याचा सामना करावा लागला या ठिकाणी कुठलेही डॉक्टर देखील उपस्थित राहत नाही उत्तर होते




रविवार आहे मग रविवारी आजारी पडायचे नाहीत का असा प्रश्न देखील त्यांनी या व्हिडिओ उपस्थित केला

## 'सिंघम अगेन' आणि 'भूल भुलैया ३'नं केला बॉक्स ऑफिसवर धमाका, कमाईचे आकडे आले समोर...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता अजय देवगणचा 'सिंघम अगेन' आणि 'कार्तिक आर्यन'चा 'भूल भुलैया ३' १ नोव्हेंबरला चित्रपटगृहामध्ये एकाच दिवशी रिलीज झाला. दोन्ही चित्रपटांनी त्यांच्या पहिल्या वीकेंडमध्ये १०० कोटींचा टप्पा ओलांडला होता. आता दुसऱ्या वीकेंडमध्ये हे दोन्ही चित्रपट २०० कोटींचा टप्पा ओलांडण्याच्या काही पावलांवर आहेत. पहिल्या वीकेंडला, 'सिंघम अगेन'नं १२१ कोटी तर 'भूल भुलैया ३'नं १०४ कोटीची कमाई केली होती. सध्या बॉक्स ऑफिसवर 'सिंघम अगेन'नं कलेक्शनच्या बाबतीत 'भूल भुलैया ३'च्या पुढे आहे. मात्र दोन्ही चित्रपट लवकरच २०० कोटींचा टप्पा गाठण्यात यशस्वी होतील, असं सध्याचं चित्र दिसत आहे.

'सिंघम अगेन'चं कलेक्शन : सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार 'सिंघम अगेन'चं बॉक्स ऑफिसवर एकूण ८ दिवसांचे कलेक्शन १८१ कोटी आहे. या चित्रपटानं ९व्या दिवशी बॉक्स ऑफिसवर ११.२ कोटी रुपयांची कमाई केली. याशिवाय चित्रपटाची दुसऱ्या वीकेंडचे एकूण कलेक्शन १९२.५ कोटी रुपये झाले आहे. 'सिंघम अगेन'नं बॉक्स ऑफिसवर ४३.५ कोटी कमाई करून सनी देओलच्या 'गदर २'च्या ओपनिंग कलेक्शनचा विक्रम मोडला आहे. 'गदर २' या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर ४० कोटीची कमाई केली होती.

'भूल भुलैया ३'चा दुसरा वीकेंड कलेक्शन : सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार कार्तिक आर्यन, विद्या बालन आणि माधुरी दीक्षित स्टारर 'भूल भुलैया ३' देखील कमाईच्या बाबतीत कमी नाही. या चित्रपटानं देखील बॉक्स ऑफिसवर प्रचंड कमाई केली आहे. 'भूल भुलैया ३'नं ९ व्या दिवशी अंदाजे १५.५० कोटी कमावले. या चित्रपटाचे दुसऱ्या वीकेंडचे कलेक्शन १८३ कोटी झाले आहे. 'भूल भुलैया ३'चं कलेक्शन १०व्या दिवशी २०० कोटींचा टप्पा पार करेल की नाही, याबाबत सांगता येत नाही. जर 'भूल भुलैया ३'नं २०० कोटींचा टप्पा ओलांडला तर, कार्तिक आर्यनच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा चित्रपट ठरेल. आतापर्यंत त्याच्या एकाही चित्रपटानं २०० कोटींचा टप्पा बॉक्स ऑफिसवर ओलांडलेला नाही.

'सिंघम अगेन'चं कलेक्शन
पहिला दिवस- ४३.५ कोटी
दुसरा दिवस - ४२.५ कोटी
तिसरा दिवस- ३५.७५ कोटी
चौथा दिवस - १८ कोटी
पाचवा दिवस - १४ कोटी
सहावा दिवस - १०.५ कोटी
सातवा दिवस - ८.७५ कोटी
आठवा दिवस - ८ कोटी
नववा दिवस - ११.५ कोटी (अंदाजे)
एकूण कलेक्शन - १९२.५ कोटी

'भूल भुलैया ३'चं कलेक्शन
पहिला दिवस- ३५.५ कोटी
दुसरा दिवस - ३७ कोटी
तिसरा दिवस- ३३.५ कोटी
चौथा दिवस - १८ कोटी
पाचवा दिवस - १४ कोटी
सहावा दिवस - १०७५ कोटी
सातवा दिवस - ९.५ कोटी
आठवा दिवस - ९.२५ कोटी
नववा दिवस - १५.५० कोटी (अंदाजे)
एकूण कलेक्शन - १८३.००

## जोडप्याने पोस्ट केला बाल्कनीतील व्हिडिओ, असं काही दिसलं की पोलिसांनी थेट अटक केली

बेंगळुरू : कर्नाटकातील बेंगळुरू येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सदाशिवनगर येथे राहणाऱ्या एका जोडप्याने सोशल मीडियावर घरातील व्हिडिओ शेअर करणे महागात पडले आहे. जोडप्याने त्यांच्या घरातील एक व्हिडिओ शेअर केला आहे. गार्डनमधील हा व्हिडिओ असून सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. लोकांनी त्यांचे कौतुकदेखील केले होते. मात्र, दुसऱ्याच दिवशी त्यांच्या अडचणीत वाढ झाली. थेट पोलिसांत प्रकरण गेले.



३७ वर्षांचा सागर गुरुंग आणि त्याची पत्नी उर्मिला कुमारी यांना बागकामाची खूप आवड आहे. सिक्कीमच्या नामची येथे राहणाऱ्या जोडप्याने त्यांच्या घरात अनेक रोपे लावली आहेत. किचनपासून ते गार्डनपर्यंत त्यांनी खूप झाडे लावली आहेत. हे जोडपं दोन वर्षांपूर्वी बेंगळुरू येथे शिफ्ट झाले होते. येथील सदाशिवनगरच्या एमएसआर नगरयेथे एक घर भाड्याने घेतलं होतं. सागर येथेच व्यवसाय करत होता. तर त्याची पत्नी उर्मिला गृहिणी होती. दोघांनी घरात खूप सारी झाडं व रोपं लावली होती.

उर्मिलाने सोशल मीडियावर एक अकाउंट तयार केले आहे. त्यावर रोज व्हिडिओ पोस्ट करते. तिने १८ ऑक्टोबर रोजी एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात तिने घरात लावलेल्या दोन डझन झाडांबद्दल माहिती दिली. तिने व्हिडिओदेखील दाखवला. तिच्या झाडांबद्दल तिने माहिती दिली. सोशल मीडियावर लोकांनी अनेक छान कमेंटदेखील केल्या आहेत. मात्र, काही लोकांची नजर त्या दोन झाडांवर गेली ज्यामुळं उर्मिला अडचणीत आली.

व्हिडिओत असलेल्या दोन झाडांकडे लोकांची नजर गेली. ते दोन झाडे गांजाची होते. त्यानंतर लोकांनी उर्मिला यांना घेरण्यास सुरुवात केली. हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ नोव्हेंबर रोजी दुपारी जोडप्याच्या घरावर छापा टाकला. सुरुवातीला गांज्याच्या रोप का लावले यावरह त्यांनी उत्तरे दिली आहे. आम्ही चौकशी केल्यानंतर दोन कुंड्यातून रोप खुडल्याचे दिसले. त्यानंतर पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गांजाची रोप लावल्याचे कबुल केले. नंतर त्यांनी गांजा डस्टबिनमध्ये फेकल्याचे सांगितले. या रोपांचे वजन ५४ ग्रॅम होते. पोलिसांनी हे जप्त केले आहेत.

पोलिसांनी दाखल केले एफआयआर

पोलिसांनी दिलेल्या माहिती, आम्ही ५ नोव्हेंबरच्या दुपारी जोडप्याच्या घरावर छापेमारी केली. आम्हाला संशय आहे की, पोलिसांना आलेले बघून त्यांनी पुरावे नष्ट करण्यासाठी त्यांनी लगेचच रोप खुडून डस्टबिनमध्ये टाकले. व्यावसायिक हेतूसाठी त्यांनी ही झाडे लावल्याचे स्पष्ट केले आहेत.

## राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी एकाच माळेतील मणी ; सुजात आंबेडकर यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी हे एक सारखेच आहेत. राहुल गांधी यांनी लोकसभेला संविधान उचलायला सुरुवात केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेनंतर संविधान उचलले. राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी हे एकाच वाडीतील मनी आहेत, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी केली.ते कल्याण विधानसभा मतदारसंघातील वंचित चे उमेदवार विशाल पावसे यांच्या प्रचारार्थ दि.१० नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलत होते.




यावेळी सुजात आंबेडकर पुढे म्हणाले की, विशाल पावशे हे वॉर्ड क्रमांक ३ चे नगरसेवक आहेत, त्यांचे काम कल्याणकरांना माहित आहे.तर कल्याण पूर्वमध्ये भाजपकडून पोलीस स्टेशनमध्ये गोळ्या झाडणाऱ्याच्या पत्नीला उमेदवारी दिली. त्यामधीलच दुसरे होते ते अपक्ष उभे आहेत. कट्टरपंथी हिंदुत्वाचे राजकारण काँग्रेस पण करत आले आहे.भाजप सुद्धा करत आहे. ज्या आरोपींनी कश्मीरमध्ये लहान मुलीवर बलात्कार केले त्या आरोपींना सोडवायचे आणि त्यांचे सत्कार करायचे काम ज्या लाला चौधरीने केलं त्याला काँग्रेसने कठूआ मधून उमेदवारी दिली.कटोगे तो बटोगे घोषणा देणाऱ्यांवर निवडणूक आयोग कारवाई करायला का घाबरत आहात ? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला. सर्वांना एकत्र घेऊन जाण्याचा आमचा एक नारा आला आहे की जुडेंगे तो जितेंगे.

हिंदू खतरे में है हा भाजपचा नारा चुकीचा आहे. कोणत्याही व्यक्तीला विचारलं की तुम्हाला धोका आहे का तर ते नाही म्हणतात, त्यांना विचारलं धर्मांतर कराल का तर त्यालाही नाही म्हणतात. त्यामुळे हिंदूंना धोका नसून आरक्षण धोक्यात आहे. असे मत वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी व्यक्त केले.

## दुसरबीडात सूर्यज्योत फाउंडेशन द्वारा आयोजित सम वैचारिक मित्र-मैत्रिणींचा सौहार्द संयोग संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** सूर्यज्योत फाउंडेशन द्वारा आयोजित सिंदखेड राजा तालुक्यातील दुसरबीड येथे सम वैचारिक मित्र-मैत्रिणींचा दोन दिवशीय निवासी सौहार्द संयोग संपन्न दिनांक ०७ नोव्हेंबर २०२४ व ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतातील काही राज्यातील व महाराष्ट्रातल्या ३६ जिल्ह्यातून संवेदनशील आणि सृजनशील तरुण-तरुणी या बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील दुसरबीड येथील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या नारायणराव नागरे महाविद्यालय एकत्रित आले होते. सूर्यज्योत फाउंडेशनचा हा पहिलाच प्रयोग होता.

कार्यक्रमादरम्यान वृक्षवल्ली आम्हा सोयरे या संत तुकोबारायांच्या ओळींना साक्ष ठेवून पर्यावरणात्मक वृक्षाचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले. या सौहार्द संयोग उद्घाटन प्रसंगी



कार्यक्रमास नारायणराव नागरे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय जिजाबाई हिम्मतराव,ओसाड गावचे प्रमुख व सेवा संकल्प परिवाराचे डॉ.नंदकुमार विमल ज्ञानेश्र्वर व सायकलवर भारत भ्रमण करणारे नागपूरचे विशाल उपस्थित होते.
या सर्व मान्यवरांनी उपस्थित तरुणांना मार्गदर्शन केले,आणि त्याचबरोबर मुलांसोबत संवाद साधत त्यांच्या प्रश्नाचे निराकरण केले..

सूर्यज्योत फाउंडेशन गेल्या अनेक वर्षापासून समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने कार्यरत आहे. तसेच अनेक निराधार वृद्धांसाठी, विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या भविष्यासाठी सतत कृतिशील आहे.
सौहार्द संयोग दुसऱ्या सत्रात अनाथांचा नाथ वंचितांच्या आयुष्यातील वेदने वरील फुंकर बालग्राम सहारा अनाथालयाचे संचालक मा. संतोष छबुबाई नारायण व अनवट वाटेवरील वाटसरू सावली फाउंडेशनचे संचालक मा. दिपक लक्ष्मी ज्ञानोबा यांनी विशेष उपस्थिती लावली आणि भविष्याचा वेध घेता तरुणाईने कसे कार्य करावे व आपल्या समाजाला कसे प्रगतशील करावे या संदर्भात सखोल माहिती दिली. रोजगार घेणाऱ्यातले नाही तर रोजगार देणाऱ्यातले व्हा असा देखील सल्ला दिला.

सदर सौहार्द संयोग कार्यक्रमात विविध उपक्रम खेळ, वैचारिक गप्पा,गाणी,गोष्टी, कवितांची मैफिल आणि बरच काही घेण्यात आले.
सहभागी तरुणांनी एक आगळावेगळा विचार या माध्यमातून घेऊन जावा यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
यात देशातील सामाजिक कार्य करणाऱ्या समवैचारिक तरुण तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून समाजासमोर एक स्वतःचे आदर्श व्यक्तिमत्व प्रकटन केले आहे. या सौहार्द संयोग कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करणारे त्याचबरोबर शैक्षणिक,आरोग्य, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी देऊन मार्गदर्शन केले आहे.

## महत्त्वाचे...

### भारताविरूद्धची तयारी पडली कांगारुंना भारी; पाकिस्तानने उडवला १४० धावात खुर्दा

नवी दिल्ली : भारताविरूद्धच्या प्रतिष्ठेच्या बॉर्डर गावस्कर मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वनडेत प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्याचा निर्णय घेतला. मात्र हा निर्णय यजमानांच्या अंगलट आला आहे. कारण पाकिस्तानच्या भेदक गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलियाचा डाव १४० धावांतच गडगडला आहे.

पाकिस्तानचा संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे. पहिल्या आणि दुसऱ्या वनडेत ऑस्ट्रेलियाने पूर्ण ताकदीचा संघ खेळवला मात्र बॉर्डर-गावस्कर मालिका लक्षात घेऊन तिसऱ्या सामन्यात प्रमुख खेळाडूंना आराम देण्याचा निर्णय घेण्यात आला. कर्णधार पॅट कमिन्ससह, मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड, मार्नस लबूशेन आणि स्टीव्हन स्मिथ यांना तिसऱ्या वनडेसाठीच्या संघातून विश्रांती देण्यात आली. विकेटकीपर फलंदाज जोश इंगलिसकडे कर्णधारपद सोपवण्यात आलं. प्रमुख खेळाडूंच्या जागी कूपर कोनेली, मार्कस स्टॉइनस, स्पेन्सर जॉन्सन, लान्स मॉरिस, शॉन अबॉट यांना संघात घेण्यात आलं.

बॉर्डर गावस्कर मालिकेचा पहिला कसोटी सामना ज्या मैदानावर होणार आहे त्याच पर्थच्या खेळपट्टीवर यजमान कांगारुंची दाणादाण उडाली. पाकिस्तानने खेळपट्टीचा नूर ओळखून नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. धडाकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध जेक फ्रेझर मॅकगर्क ७ धावा करुन तंबूत परतला. चेंडू खेळावा की सोडावा या विचारात असताना आरोन हार्डीच्या बॅटची कड घेऊन चेंडू स्लिपच्या क्षेत्ररक्षकाच्या हातात जाऊन विसावला. कर्णधारपदाची जबाबदारी मिळालेला इंगलिसही मोठी खेळी करू शकला नाही. त्याने ७ धावा केल्या. हारिस रौफने शॉर्टला तंबूत परतावलं. दुखापतीमुळे कोनेलीला मैदान सोडावं लागलं.

अनुभवी ग्लेन मॅक्सवेल आणि मार्कस स्टॉइनस यांच्याकडून ऑस्ट्रेलियाला मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण रौफच्या चेंडूवर मॅक्सवेल फसला. त्याला भोपळाही फोडता आला नाही. मोहम्मद हसनैनने स्टॉइनसला बाद केलं. त्याने ८ धावा केल्या. ८८६ अशी अवस्था झालेल्या ऑस्ट्रेलियाचा डाव शॉन अबॉट आणि ॲडम झंपा यांनी सावरला. नसीम शहाने झंपाला बाद करत ही भागीदारी तोडली. त्याने १३ धावा केल्या. अबॉटने बाद होण्यापूर्वी ३० धावांची खेळी केली.

पाकिस्तानतर्फे शाहीन शहा आफ्रिदी आणि नसीम शहा यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. हारिस रौफने २ तर हसनैनने एक विकेट पटकावली. अवघ्या ३१.५ षटकात ऑस्ट्रेलियाचा डाव १४० धावांतच संपुष्टात आला.

### धनंजय महाडिक आगीतून फुफाट्यात? महिलांबाबत केलेल्या वक्तव्यावरून माफी मागताना नवं वक्तव्य, म्हणाले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ''लाडकी बहिणी योजनेचे १५०० रुपये घेणाऱ्या महिला काँग्रेसच्या प्रचारफेऱ्यांमध्ये दिसल्या तर त्यांचे फोटो काढून घ्या, आम्ही त्यांची व्यवस्था करतो'', असं वादग्रस्त वक्तव्य भाजपाचे खासदार धनंजय महाडिक यांनी शनिवारी (९ नोव्हेंबर) रात्री कोल्हापुरात आयोजित एका प्रचारसभेत बोलताना केलं. त्यांच्या या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी या वक्तव्यावरून खासदार धनंजय महाडिक यांनी राज्यातील महिलांची माफी मागावी अशी मागणी केली आहे. तर काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील यांनी 'ही तर धनंजय महाडिक यांची मुजोरी आहे', अशा शब्दांत हल्लाबोल केला आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजना हा प्रचाराचा केंद्रबिंदू बनला आहे. कोल्हापुरात झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेत १५०० रुपयांऐवजी दर महिन्याला २१०९ रुपये देण्याची घोषणा केली. तर, त्यापाठोपाठ महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात महालक्ष्मी योजनेअंतर्गत तीन हजार रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये शाब्दिक वाद चालू असतानाच भाजपा नेते धनंजय महाडिकांनी हे वक्तव्य करून वाद ओढवून घेतला आहे.

दरम्यान, या वक्तव्यानंतर सर्व स्तरातून महाडिकांवर टीका होऊ लागली आहे. त्यामुळे त्यांनी आता माफी मागितली आहे. महाडिकांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की ''माझ्या वक्तव्याने कुठल्याही माता भगिनींचे मन दुखावले असेल तर त्यांची मी बिनशर्त माफी मागतो''.

महाडिकांनी म्हटलं आहे की ''माझे हे वक्तव्य कुठल्याही माता भगिनीचा अपमान करण्यासाठी मुळीच नव्हते. तर निवडणूक काळात राजकीय प्रचार करताना विरोधी पक्षाच्या खोट्या प्रचाराला बळी पडणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजना ही फक्त महायुती सरकारमुळेच यशस्वी झाली असल्याचे ठामपणे नमूद करताना विशेषत: व्होट जिहाद करणाऱ्या महिलांच्या प्रती आलेली स्वाभाविक प्रतिक्रिया आहे''.भाजपा खासदार म्हणाले, ''मी माझ्या वैयक्तिक, राजकीय आयुष्यात महिलांचा नेहमीच सन्मान करत आलेलो आहे. मी व माझी पत्नी गेली अनेक वर्षे भगीरथी महिला संस्थेमार्फत महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी नेहमीच चांगले काम करत आलो आहोत आणि यापुढे देखील करत राहीन. महिलांचा सन्मान आणि सशक्तीकरणबाबत माझ्या या प्रयत्नांची दखल घेऊन माझ्या वक्तव्याने मन दुखावलेल्या माझ्या भगिनी मला मोठ्या मनाने माफ करतील, अशी आई अंबाबाई चरणी मी प्रार्थना करतो''.

विविध वृत्त...

## श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून तुळजापूर बोधचिन्ह निवडण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी** : श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांचेकडून मंदिर संस्थांचे बोधचिन्ह तयार करण्यासाठी क्रिएटिव्ह डिझाईन मागवण्यात आल्या होत्या. यासाठी १९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांच्या समक्ष या बोधचिन्ह तयार करणाऱ्या व्यक्तींचे सादरीकरण होऊन ते बोधचिन्ह मतदानासाठी मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले होते. त्या बोधचिन्हावर (त्दुद) मतदान करण्याचे आवाहन तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे बोधचिन्ह तयार करण्यासाठी मागवण्यात आलेल्या बोधचिन्हाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या व्यक्तीसोबतच संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या ईओआयनुसार २३ सप्टेंबरपर्यंत इमेलवर लोगो सादर करणारे व्यक्ती यांचे लोगो विचारात घेऊन त्यानुसार सर्व लोगो वोटींगसाठी उपलब्ध करण्यात आलेले आहेत. या सर्व लोगोंना सर्व जनतेने मतदान करावे यासाठी सर्व बोधचिन्ह (लोगो) मंदिराचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत . भाविकांनी मतदान करणेसाठी https://shrituljabhavanitempletrust.org या संकेतस्थळावरील होमपेजवर सर्व लोगो वोटींग या लिंकवर जाऊन लोगोची पाहणी करून पसंत असलेल्या लोगोसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मतदान करावे, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

## हार्दिक पांड्याला घटस्फोट दिल्यानंतर ४ महिन्यानी नताशाने सोडलं मौन; 'हार्दिक आणि मी अजूनही....'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : नताशा स्टॅनकोविक आणि हार्दिक पांड्या यांनी घटस्फोट घेतला असून वेगळे झाले आहेत. काही काळापासून, सोशल मीडियावर अशी चर्चा होती की, अभिनेत्री तिच्या मुलासह सर्बियाला जाणार आहे. यावर अभिनेत्रीने सांगितले की, ती सर्बियाला परतणार नाही.

भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या आणि नतासा स्टॅनकोविक यांनी जुलै २०२४ मध्ये घटस्फोटाची घेतला. त्यांचे चार वर्षांचे नाते संपुष्टात आले आहे. या जोडप्याला 'अगस्त्य' नावाचा मुलगाही आहे. नताशा काही काळासाठी सर्बियाला गेली होती, त्यानंतर सोशल मीडियावर ती अगस्त्यासोबत सर्बियाला कायमती शिफ्ट होणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. पण या सगळ्यात नताशाने पहिल्यांदा घटस्फोट आणि कुटुंब याबद्दल मोकळेपणाने आपलं त मांडल आहे.

नताशाने मुलासह मुंबई सोडली का?

नताशा स्टॅनकोविकने एऊग्से शी बोलताना सांगितले, ''मी परत जाईन अशी सगळीकडे चर्चा आहे. पण मी असं कसं जाणार? मला एक मूल आहे. अगस्त्य इथे शाळेत जातो. त्यामुळे इथून आम्ही कुठे जाणार नाही आणि मुलाला येथे राहण्याची आवश्यकता आहे. तो इथला आहे. त्याचं कुटुंब इथेच आहे. हार्दिक आणि मी अजूनही एक कुटुंब आहोत. आम्हाला एक मूल आहे आणि ते मूल नेहमीच आमच्याकडे कुटुंब म्हणून पाहते. अगस्त्याला त्याच्या आई–वडिलांसोबत राहावे लागते. जवळपास १० वर्षे झाली आहेत आणि मी दरवर्षी याच वेळी सर्बियाला जातो. नताशाला विचारण्यात आले की ती आणि हार्दिक मिळून अगस्त्याला वाढवतील का? यावर अभिनेत्री म्हणाली, ''हो. ''आम्ही सह–पालकत्व करत आहोत.'' नताशाच्या या उत्तराने अनेक हार्दिक पांड्यासोबत घटस्फोट घेतल्यानंतर नताशा स्टॅनकोविचला कोणत्याच इक्वेशनबाबत चर्चा करायची नाही. अभिनेत्री म्हणाली, ''तिला खाजगी राहायला आवडते, तिच्याकडे लपवण्यासारखे काही नाही म्हणून नाही तर खाजगी आयुष्य खाजगी असले पाहिजे म्हणून. लोकांच्या निर्णयावर अभिनेत्री म्हणाली, यावेळी लोक मला ओळखत नाहीत आणि त्यांनी मला ओळखावे अशी माझी इच्छा देखील नाही. लोकांना फक्त गोष्टी कशा चर्चेत आणायच्या हे माहित आहे. लोक माझी बाजू घेतील अशी मी अपेक्षा करू शकत नाही. मला साधे जीवन जगायचे आहे. लोक काय विचार करतात याने मला काही फरक पडत नाही. मी सध्या स्वत:शी बद्ध आहे.''

## प्लास्टिकच्या वस्तू ठेवलेल्या दुकानाला मध्यरात्री भीषण आग, होरपळून तिघांचा मृत्यू


**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर येथील फुलंब्री परिसरात प्लास्टिकच्या दुकानाला भीषण आग लागली. या आगीच्या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला. ही आग रविवारी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास लागली. प्लॅस्टिकच्या दुकानाला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, फुलंब्री येथील दुकानात अचानक शॉर्ट सर्किट होऊन आग लागली. आगीमुळे दुकान उघडण्यासाठी आलेल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला. शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याच्या घटना सतत घडतात. प्लास्टिकसारखे ज्वलनशील पदार्थ असल्यास आगीची तीव्रता आणखीन भडकते. आगीच्या दुर्घटनमुळे दुकाने आणि इतर व्यावसायिक आस्थापनांमधील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला. यात नितीन रमेश नागरे (वय २५), गजानन वाघ (वय ३०), राजू सलीम पटेल (वय २५) सर्व राहणार फुलंब्री अशी मृतांची नावे आहेत. तर घटनेत शाहरुख सलीम पटेल आणि अजय सुभाष नागरे हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.फुलंब्री तालुक्यातील दरी फाटा भागात राजू स्टील आणि प्लास्टिक नावाचे दुकान आहे. या दुकानात मोठ्या प्रमाण प्लास्टिक साहित्य भरलेले होते. रविवारी पहाटे रात्री एक वाजून ४५ मिनिटांनी दुकानातील आतील भागात शॉक सर्किटमुळे आग लागली. दुकानात मोठ्या प्रमाणात गॅस तयार झाला. आग लागल्याची माहिती दुकान मालक आणि शेजारी असलेल्या दुकान मालकाला समजली. त्यांनी तातडीनं दुकानाकडे धाव घेतली. दुकानाचे शटर उघडताच आतमध्ये तयार झालेल्या गॅसने तीन लोकांना वेगाने बाहेर फेकले गेले. यात ते लोखंडी पार्टवर आदळले.

# महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचाराचा झंजावत

## मेहकर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ







**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी प्रचारात आघाडी घेतली असून प्रचार दौऱ्यादरम्यान त्यांना गावागावात मतदारसंघातील नागरिक उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. मतदारसंघात प्रचार दौऱ्यादरम्यान महाविकास आघाडी तथा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी प्रचाराचा प्रारंभ सारंगधर बालाजी. छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह इतर महापुरुषांच्या स्मारकास वंदन करून करण्यात आला. या प्रचारादरम्यान मेहकर लोणार मतदार संघातील नागरिकांनी विशेष करून युवक युवातींनी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना उत्स्फूर्त पाठिंबा देत प्रचार दौऱ्यात सहभाग घेतला.

यावेळी मतदारांनी गावातील विकास ठप्प झाल्याचे सांगून गावात रस्ते पिण्याच्या पाण्याची सुविधा, आदी प्राथमिक सुविधाही उपलब्ध नसल्याची आपबिती महाविकास आघाडीचे पदाधिकारी व उमेदवार यांच्याजवळ व्यक्त केली. तर गावातील विकासाला गती देण्याची एक संधी महाविकास आघाडीचा उमेदवार या नात्याने मला द्या अशी साद महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी ग्रामस्थांकडे घातली असता मतदारांनी उस्फुर्त पाठिंबा देत यावेळेस महाविकास आघाडीचे सरकार आणण्याचा व मेहकर मतदार संघातही महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी करण्याचा निर्धार करत महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचार दौऱ्यात हजारोच्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी महाविकास आघाडीतील शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर पक्षांचे ज्येष्ठ नेते, जिल्हाध्यक्ष, जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, जिल्हा परिषद सदस्य, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, तालुकाध्यक्ष, तालुकाप्रमुख, नगरसेवक, नगराध्यक्ष, शहरप्रमुख, शाखाप्रमुख तसेच इतर सर्व पदाधिकारी, युवासेनेचे सर्व पदाधिकारी, अल्पसंख्याक समाजाचे नेते, महिला विकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विकासासाठी मशाल चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करा

मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्याचबरोबर मतदार संघातील युवकांच्या हाताला काम देण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार या नात्याने माझ्या मशाल या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विधानसभा निवडणुकीत विजयी करा, असे आवाहन महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी मतदारांना केले.

## 'जरांगेंच्या केसाला धक्का जरी लागला ना तर...', ठाकरे गटाच्या नेत्याचा सरकारला इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : मनोज जरांगे पाटील यांच्या केसाला जरी धक्का लागला तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी पळून पळून मारू, असे विधान शिवसेना युबीटीचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केले आहे. तसेच जरांगे पाटलांच्या विरोधात ज्यावेळी राज ठाकरे बोलले होते त्यावेळेस त्यांच्या गाडीवर सुपाऱ्या फेकल्या होत्या.त्यामुळे तो विरोधात बोलेल त्याला गाडू, अशा इशारा ठाकरेंच्या या जिल्हा प्रमुखाने दिला आहे.तसेच गणेश वरेकर यांच्या या विधानानंतर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर बीडच्या एका सभेत बोलत होते. या सभेतून बोलताना गणेश वरेकर यांनी मोठं विधान केले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे ज्यावेळेस जरांगे पाटलांच्या विरोधात बोलले होते, त्यावेळेस त्यांच्या गाडीवर सुपाऱ्या फेकल्या होत्या. आता जरांगे पाटलांच्या केसाला जरी



धक्का लागला तर मुख्यमंत्री,उप मुख्यमंत्री यांना पळू पळू मारू, असा धमकीवजा इशारा गणेश वरेकर यांनी सरकारला दिला आहे. दरम्यान वरेकर यांच्या या विधानानंतर मोठा वाद पेटण्याची देखील शक्यता आहे.

विधानसभा निवडणुकीवर जरांगेंची भूमिका काय?

मनोज जरांगे पुढे म्हणाले, मी स्पष्ठ सांगूनही सांगून देखील अनेकांमध्ये संभ्रम आहे. राजकारण आणि मतदान असा संभ्रम नकोच म्हणून कुणाच्या मतांवर चालू नका. माझेही ऐकू नका. मतदानाचा सन्मान तुमच्या हातात आहे. त्यामुळे कुणाला पाडायचे त्याला पाडा, ज्याने आपल्यावर अन्याय केला त्याला सोडू नका,असे आवाहन जरांगे पाटलांनी केले. तसेच मतदान कुणाला करायचे, कुणाला पाडायचे आणि कुणाकडून बॉण्ड आणि व्हिडिओ घ्यायचा ते आता स्वत: मराठा समाजाने ठरवावे. तुम्हाला कोण मदत करेल? कोण आपल्या आरक्षणासाठी काम करेल? अशा लोकांच्या पाठीशी राहावे आणि हा निर्णय स्वत: समाजाने ठरवावे, असे जरांगे यांनी सांगितलंय.

राजकारणाच्या तयारी पेक्षा फुकट कुणाला मोठे करण्या पेक्षा आंदोलनाच्या तयारीला लागू. प्रचार सभेला प्रचाराला जाऊ नका.पण मतदान मात्र सर्वांनी करावे. ज्याला जे करायचे ते करा पण आरक्षणासाठी ज्याने त्रास दिला त्याला सोडायचे नाही, आता पूर्ण कारभार मराठा समाजाच्या हातात दिला आहे,असे देखील जरांगेंनी सांगितले.

## संपला विषय! राज्याचा पुढचा CM कोण? अमित शाह हसतच म्हणाले, 'सध्या महाराष्ट्रात...'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय जनता पार्टीने आज विधानसभा निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा म्हणजेच संकल्पपत्र जाहीर केलं. मुंबईमध्ये पक्ष कार्यालयात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या उपस्थितीत संकल्पपत्राचं जाहीर वाचन करण्यात आलं. शिक्षण, गुंतवणूक, महिला, शेतकरी, रोजगार यासारख्या सर्वांगिक गोष्टींचा समावेश असलेल्या संकल्पपत्रातील तरतुदींवर अमित शाहांबरोबरच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकाश टाकला. या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना अमित शाहांना महाराष्ट्राचा पुढचा मुख्यमंत्री कोण असेल असा प्रश्न विचारण्यात या प्रश्नाला अमित शाहांनी अगदी मोजक्या शब्दांमध्ये आणि स्पष्टपणे उत्तर देत मागील काही दिवसांपासून सुरु असलेल्या उलट–सुलट चर्चांना पूर्विराम दिला आहे.

चर्चांना उधाण का?

''महाराष्ट्रातील जनतेची एकच भावना आहे. आपल्याला पुन्हा एकदा महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांना विजयी करायचे आहे,'' असं विधान अमित शाह यांनी शुक्रवारी महाराष्ट्रातील जाहीर सभेत केलं. यावरुनच फडणवीस पुढील मुख्यमंत्री असल्याचे संकेत शाहांनी दिलेत अशी चर्चा सुरु झाली. असं असतानाच आज अमित शाहांनाच थेट मुख्यमंत्री कोण असेल यासंदर्भात प्रश्न विचारला गेला. त्यावर अमित शाहांनी हसतच उत्तर दिलं.

अमित शाह काय म्हणाले?

''तुम्ही जो मुख्यमंत्रिपदासंदर्भात जो प्रश्न विचारला त्याचं मी आधी उत्तर देतो. कारण त्या उत्तरानंतर आता प्रश्न विचारायला ज्यांनी हात वर केले आहेत जे पुन्हा हात वर करणार नाही,'' असं अमित शाह यांनी म्हणताच देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे हसू लागले. स्वत: अमित शाहही यावर हसले. त्यानंतर पुढे बोलताना शाह यांनी, ''सध्या महाराष्ट्रात युती सरकारचं नेतृत्व एकनाथ शिंदेजी करत आहेत. एकनाथ शिंदे आमचे मुख्यमंत्री आहेत. निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण होणार हे तिन्ही पक्ष एकत्र बसून हे ठरवतील. आम्ही शरद पवारांना कोणतीही संधी देणार नाही,'' असं उत्तर दिलं.

जिंकणार यात कोणतीच शंका नाही

महायुतीचं जिंकणार का? यासंदर्भातील प्रश्नावर अमित शाहांनी, ''बहुमताने भाजपा आणि मित्र पक्षांचं सरकार बनणार आहे. यात कोणतीची शंका नाहीये,'' असं उत्तर दिलं. काँग्रेस पक्ष जातीसंदर्भातील प्रश्न उपस्थित करुन समाजात विभाजन करण्याचा प्रयत्न करत आहे, असंही अमित शाह म्हणाले.

कोणकोण होतं उपस्थित?

अमित शाहांबरोबरच राष्ट्रीय सचिव विनोद तावडे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, संकल्प पत्र बनवणाऱ्या समितीचे अध्यक्ष सुधीर मुनगंटीवार आणि विनय सहस्त्रबुद्धे उपस्थित होते.

## मताच्या भीतीपोटी काँग्रेसचा खोटारडेपणा सुरू चंद्रशेखर बावनकुळे यांची काँग्रेसवर टीका

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी** : काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा जाहीरनामा हा फसवा असून त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही कारण काँग्रेसच रक्त विकास करण्याचा नाही. मताच्या भीतीपोटी काँग्रेसचा खोटारडेपणा सुरू आहे अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते नागपूर येथे दि.१० नोव्हेंबर रोजी प्रसारमाध्यमाशी बोलत होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, मल्लिकार्जुन खर्गे परवा या विरोधात बोलले आणि काँग्रेसचे लोक लाडकी बहीण योजनेच्या विरोधात कोर्टातही गेले.मताच्या भीतीपोटी त्यांनी पुन्हा हा खोटारडेपणा सुरू केला आहे.तर महाडिक यांनी लाडकी बहिण योजनेबद्दल केलेले वक्तव्य हे वक्तव्य हे चुकीचे आहे, त्यांनी त्याबद्दल माफी मागितली. मात्र भाजपच्या कोणत्याही नेत्यांनी भावनेच्या भरात किंवा उत्साहात असे असे वक्तव्य करू नये, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. तर जितेंद्र आव्हाड स्टंटबाज आहे त्यांचा जास्त लोड घेण्याची गरज नसल्याचे मत व्यक्त केले. तर देशाने बघितले आहे. कोणाचं पायगुण चांगले आहेत. राहुल गांधी यांचा पायगुण चांगला नाही तर मोदी हे विश्व गौरव पुरुष आहेत. खर्गे मतासाठी काही पण बोलतात ते कधी संग मुख्यालय आले का ? त्यांच्याकडे दुर्बीण आहे का ? खर्गेंनी एकदा संघ कार्यालयात येऊन बघावं काय काय आहे ते अशी बोचरी टीका ही त्यांनी यावेळी केली.काँग्रेस लाडकी बहीण योजनेचे ३ हजार करणार असल्याचे सांगत आहेत. मात्र काँग्रेसवाले खोटारडे आहे, योजना बंद करावी म्हणून कोर्टात गेले.विजय वडेट्टीवार सह अनेक नेते बोलले आम्हाला परवडणार नाही आता ते योजना परत आणत आहेत.आमचं बजेट तयार आहे, रस्ते, वीज, पाणी यासाठी केंद्राकडून पैसे आणू असे ते म्हणाले तर मनोज जिरंगे पाटील यांच्या बद्दल मी बोलणे योग्य नाही, त्यांची सामाजिक मागणी आहे. जेव्हा जेव्हा सरकार येईल तेव्हा त्यांचे प्रश्न्न पूर्ण करण्याची जबाबदारी सरकारची आहे.शरद पवारांचा मोठा अनुभव आहे. त्यांच्याबद्दल मी टिप्पणी करणे योग्य नाही मात्र महाराष्ट्राची जनता आता महायुतीच्या बाजूने आहे. असे मतही यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

# ट्रकला कंटेनरची मागून धडक एक ठार; दोन जखमी

## समृध्दी महामार्गावरील घटना: पंचर काढण्यासाठी थांबला होता ट्रक

दैनिक आपला विदर्भ





**डोणगाव/प्रतिनिधी** : पंचर झालेल्या ट्रकला कंटेनर ने मागून धडक दिल्याने एक ठार तर दोन जखमी झाले. ही घटना दि. १० नोव्हेंबर रोजी डोणगांव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या समृध्दी महामार्गावर बेलगाव ते केनवड च्या दरम्यान चॅनल नंबर २६० जवळ घडली. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार नागपुर कडून एमएच. २८ बीबी ६५६५ या क्रमांकाचा ट्रक पंक्चर झाल्यामुळे समृध्दी महामार्गावर सकाळी १०.३० वाजताच्या दरम्यान शेवटच्या लेनवर थांबला होता. ट्रक चालक पक्चरचे टायर बदलत असताना मागून पीबी ११ १७९२ या क्रमांकाच्या कंटेनर ट्रकवर आदळला. यामध्ये ट्रक ड्रायव्हर समाधान अभिमान आसोले वय ४० रा. आगेफळ ता. सिंदखेडराजा. हा ठार झाला. तर ट्रक क्लिनर यादव साहेबराव टेकाळे रा. मलकापूर पांग्रा, कंटेनरचा ड्रायव्हर प्रकाश सुखदेव हिरफकर रा.जुगार पेठ ता. सांगोला हे दोन जखमी झाले. सदर माहिती मिळताच डोणगाव पोलीस स्टेशनंचे ठाणेदार अमर नागरे, पोकॉ आनंद चोपडे, पीएसआय गणेश डव्हळे, पोकॉ.सरदार यांनी जखमींना त्वरीत मेहकर येथे हलविले.